शासन ज्ञापन क्रमांक: जमीन -२६०२/१७०१/प्र. क्र.११७१/ज-६

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक - ३ डिसेंबर, २००८.

विषय - जमीन- मुंबई उपनगर जिल्हा
महानगर गॅस लिमिटेड यांना सीएनजी आउटलेट
स्टेशन उभारण्यासाठी भूखंड मंजूर करण्याबाबत....

ज्ञापन :-

विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांना त्यांचे पत्र क्र.मशा/कार्या-२/जमीन-१/ कावि-४९२/ २००५, दिनांक ३१/०५/२००५ व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना त्यांचे पत्र क्रमांक सी/कार्या-२डी/एलएनडी/कावि-३१/२००५, दिनांक १५/०३/२००५ च्या अनुषंगाने विज्ञप्तीपूर्वक असे कळविण्यात येते की, महानगर गॅस लिमिटेड यांना सी.एन.जी. आउटलेट स्टेशन उभारण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम,१९७१ मधील नियम-३५ मधील तरतूदीनुसार त्या जमिनीची शीघ्रसिध्दगणकानुसार प्रचलित बाजारभावाची किंमत निश्चित करुन घेऊन सदर किंमतीवर भारतीय स्टेट बँकेच्या प्रत्येक वर्षाच्या १ जानेवारी रोजी अस्तित्वात असलेल्या "प्राईम लेंडींग रेट" प्रमाणे होणाऱ्या व्याजाच्या रकमेइतके प्रतीवर्षी भाडे आकारुन, ३० वर्षाच्या भाडेपट्ट्याने व या भाडेपट्ट्यात प्रत्येक १० वर्षांनी सुधारणा करण्याच्या तसेच नेहमीच्या अटी/शर्तीवर व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना योग्य वाटतील त्या अटी/शर्तीवर व खालील अतिरिक्त अटींवर, खालील तक्त्यातील स्काना क्र.५ प्रमाणे सी.एन.जी. आउटलेट स्टेशनसाठी आरक्षित असलेल्या जमिनीचे क्षेत्र (महानगर गॅस लिमिटेड यांना) मंजूर करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे :-

| अ. क्र. | गाव | न. भू. क्र. | एकूण क्षेत्र (चौ.मी.) | सीएनजी साठी आरक्षित क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | कांदिवली | ११५१ | १,७१८.३ | ७५० |
| २ | आर ए | २५८ (पै) | २९० हेक्टर | १,५०० |
| ३ | मानखुर्द | १ पै देवनार<br>१ पै | ९१,०५४ | १,५०० |
| ४ | घाटकोपर | १९४ पै | -- | १,५०० |

अटी : १) प्रस्तावित भूखंडावर अतिक्रमणे असल्यास ती हटविण्याची व त्यांतील शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे पात्र असलेल्या झोपडपट्टीधारकांना पर्यायी जागा / सदनिका स्वखर्चाने उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी सर्वस्वी महानगर गॅस लिमिटेड यांची असेल. संबंधितांनी जमिनीवरील अतिक्रमणे हटविण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी / सक्षम अधिकाऱ्याकडून करुन घ्यावी.

२) जिल्हाधिकाऱ्यांनी मंजूर जमिनीबाबत न्यायालयात दावे प्रलंबित नाही याची खातरजमा करुन संबंधितांना जमिनीचा ताबा देण्याबाबत कार्यवाही करावी.

Scanned by CamScanner

२. सदर शासन ज्ञापन वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ६००/०५/व्यय-९, दिनांक २०/१०/२००५ ला अनुलक्षून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( वि. वि. वखारे )
अवर सचिव,
महसूल व वन विभाग.

प्रति,

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत, १० वा मजला,
वांद्रे (पूर्व), मुंबई -४०००५१.

प्रतिलिपी :-

१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई .
२) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१/२, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५) उपसंचालक, भूमि अभिलेख, मुंबई.
६) सहाय्यक संचालक, नगररचना व मूल्यनिर्धारण, मुंबई उपनगर जिल्हा.
७) नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
८) वित्त विभाग (व्यय-९), मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
९) ज-३ कार्यासन (निवडनस्ती) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

-----

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू ) मुंबई-५१

दूरध्वनी : ६५५६७९९, ६५५०१११ फॅक्स : ६५५६८०५ E mail – collrmsd@yahoo.com

(15)

क्रमांक :- ८५/३डी/एल-६५०
दिनांक :- __ /१२/२००८
07 JAN 2009

**वाचले :** शासन महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र. एलआरएफ- २६०२/१७०१/प्र.क्र. ११७१/ज-३ दि.३/१२/२००८

**आदेश :**

उपरोक्त शासन ज्ञापनान्वये महानगर गॅस लिमिटेड यांना सी.एन.जी. आउटलेट स्टेशन उभारण्यासाठी महाराष्ट्र जमिन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ मधील नियम ३५ मधील तरतूदीनुसार त्या जमिनीची शीघ्रसिध्दगणकानुसार प्रचलित बाजारभावाची किंमत निश्चित करुन घेऊन सदर किंमतीवर भारतीय स्टेट बँकेच्या प्रत्येक वर्षाच्या १ जानेवारी रोजी अस्तित्वात असलेल्या प्राईम लेंडीग रेट प्रमाणें होणाऱ्या व्याजाच्या रक्कमेइतके प्रतीवर्षी भाडे आकारुन, ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने व या भाडेपट्ट्यात प्रत्येक १० वर्षांनी सुधारणा करण्याच्या तसेच नेहमीच्या अटी/शर्तीवर खालील तक्त्यातील रकाना क्र. ५ प्रमाणें सी.एन.जी. आउटलेट स्टेशनसाठी आरक्षित असलेल्या जमिनीचे क्षेत्र (महानगर गॅस लिमिटेड यांना) मंजूर करण्यास शासन मान्यता देण्यांत आली आहे.

| अ.क्र. | गाव | न.भू.क्र. | एकूण क्षेत्र (चौ.मी.) | सीएनजीसाठी आरक्षित क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| १ | कांदिवली | ११५१ | १७१८.३ | ७५० |
| २ | आरे | २५८(पै.) | २९० हेक्टर | १५०० |
| ३ | मानखुर्द | १पै देवनार १पै. | ९१,०५४ | १५०० |
| ४ | घाटकोपर | १९४पै | -- | १५०० |

सबब वरीलपैकी मौजे. आरे(पहाडी गोरेगांव), ता. बोरीवली येथील न.भू.क्र. २५८पै मधील १५०० चौ.मी. जमीन महानगर गॅस लिमिटेड यांना सी.एन.जी. आउटलेट स्टेशनसाठी उक्त शासन ज्ञापनाच्या अधिन राहून खालील अटी व शर्तीवर ३० वर्षांच्या भाडेपट्टयाने मंजूर करणेंत येत आहे.

**अटी /शर्ती:**

१) सन २००८ रोजीचे शिघ्रसिध्दगणकानुसार प्रश्नांकित जमिनीचे आज रोजीचे मुल्यांकन रक्कम रु.२३,०००/- प्रती चौ.मी. प्रमाणें एकुण बाजारभाव रक्कम रु. ३,४६,९३,६८०/- या रक्कमेंवर



Scanned by CamScanner

स्टेट बँक ऑफ इंडियाचा पी.एल.आर. १२.७५ नुसार प्रतिवार्षिक भाडेपट्टा रक्कम रु. ४४,२३,४४४/- इतका येत आहे. सदरच्या भाडेपट्ट्याची रक्कम Collector, Mumbai Suburban District यांचे नांवे धनाकर्ष काढून या आदेशाचे दिनांकापासून ७ दिवसाचे आत या कार्यालयात जमा करावा.

२) प्रस्तावित भूखंडावर अतिक्रमणं असल्यास ती हटविण्याची व त्यांतील शासनाच्या प्रचलित धोरणांप्रमाणे पात्र असलेल्या झोपडपट्टीधारकांना पर्यायी जागा/सदनिका स्वखर्चाने उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी सर्वस्वी महानगर गॅस लिमिटेड यांची असेल. संबधीतांनी जमिनीवरील अतिक्रमणं हटविण्याची कार्यवाही उपजिल्हाधिकारी(अति/निष्का), मालाड यांच्याकडून करुन घ्यावी.

३) सदरचे जमीनीबाबत न्यायालयात दावे प्रलंबित नाहीत याची खातरजमा झाल्याशिवाय जमिनीचा ताबा देण्यांत येणार नाही.

४) भाडेपट्ट्याच्या दरात दर १० वर्षानंतर सुधारणां करण्यांत येईल.

५) उक्त जमीन सी.एन.जी. आऊटलेट स्टेशनसाठी मंजूर करणेंत येत आहे. सबब त्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य कोणताही वापर करता येणार नाही.

६) विविध प्रयोजनासाठी सवलतीच्या दराने शासकीय जमीन मंजूर करतांना आकारावयाच्या कब्जेहक्काच्या/भाडेपट्ट्याच्या रक्कमेबाबत सुधारीत धोरण शासनाच्या विचाराधीन असून त्यामध्ये जो निर्णय घेण्यांत येईल त्याप्रमाणे कब्जेहक्काची/भाडेपट्ट्याची रक्कम अदा करण्यांस तयार असल्याबाबतचे लेखी हमीपत्र या कार्यालयास सादर केल्यानंतरच जमीनीचा ताबा देण्यांत येईल.

७) जमीन ज्या प्रयोजनाकरीता प्रदान करण्यांत येत आहे, त्या प्रयोजनाकरीता जमिनीचा ताबा घेतल्यापासून वापर दोन वर्षात न केल्यास जमीन शासनाकडे परत करणें बंधनकारक राहील.

८) जमिनीवरील सी.एन.जी. आऊटलेट स्टेशनच्या वापरासाठी आणि बांधकामाकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेची आवश्यक ती परवानगी घेणें संस्थेवर बंधनकारक राहील.

९) संस्था(पट्टेधारक) जिल्हाधिकाऱ्यांकडून याबाबतीत प्राधिकृत करण्यांत येईल अशा सरकारी अधिकाऱ्यांना सर्व वाजवी वेळात जमिनीच्या उक्त तुकड्याच्या कोणत्याही भागात प्रवेश करुन त्यांचे निरिक्षण करण्यांस परवानगी देईल.

१०) संस्था जमिनीचा उक्त तुकडा किंवा त्याचा कोणताही भाग पोट भाड्याने देणार नाही किंवा त्यावर कोणताही भार निर्माण करणार नाही.



Scanned by CamScanner

११) भविषयात जर शासकीय किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरण्याच्या प्रयोजनाकरीता सदर जमिन आवश्य असेल तर १ महिन्याची लेखी नोटीस देऊन भाडेपट्टा कोणत्याही वेळी रद्द करणेंत येईल.

१२) संस्था जमिनीच्या उक्त तुकड्यावर निश्चित करण्यांत आलेला भाडेपट्टा वेळोवेळी बसविण्यांत येईल अशा उपकरांसह दरवर्षी ऑगस्टच्या पहिल्या तारखेस जिल्हाधिकारी/तहसिलदार यांचेकडे आगावू भरेल.

१३) या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीन्वये भाडेपट्टा समाप्त करण्यांत आल्याच्या प्रसंगी भाडेपट्टा समाप्त झाल्याबद्दल भाडेपट्टेधारकाला कोणत्याही प्रकारच्या भरपाईदाखल दावा सांगण्याचा अधिकार असणार नाही. शर्त क्र. १२ अन्वये भाडेपट्टा समाप्त करणेंत आला असेल तर उक्त खंडान्वये दिलेल्या नोटीसीची मुदत संपण्यापुर्वी आणि इतर बाबतीत जिल्हाधिकारी निश्चित करील अशा मुदतीत स्वखर्चाने जमिनीच्या उक्त तुकड्यावर उभे असलेले कोणतेही बांधकाम किंवा बांधकामे काढून टाकील आणि उक्त कालावधी संपल्यावर कुळवहिवाट सुरु होण्याच्या वेळी जमिनीचा उक्त तुकडा ज्या स्थितीत होता त्याच स्थितीत त्याचा कब्जा जिल्हाधिकाऱ्याच्या स्वाधीन करील.

१४) जिल्हाधिकाऱ्यांना योग्य वाटतील अशा शर्तीवर भाडेपट्ट्याची मुदतीपर्यंत नुतणीकरण (Renewal) करण्यांत आले नसेल तर पट्टेधारक कोणताही अडथळा न आणता व शांततापूर्वक उक्त मुदत संपल्यावर जमिनीच्या उक्त तुकड्यांचा कब्जा ज्या स्थितीत घेतला असेल त्याच स्थितीत शासनाला/जिल्हाधिकाऱ्यांना देईल.

१५) मंजूर जमीनीव्यतिरिक्त सरकारी जमीनीतून ती वर किंवा ती खालून पाण्याचे प्रमुख नळ, नळ पाईप घालणेस शासन /जिल्हाधिकारी यांची परवानगी घेणे पट्टेदारास बंधनकारक राहील.

१६) जमिनीखालील गौण व खनिजाचे हक्क शासनाचे राहतील.

१७) भाडेपट्ट्याची गणना करणेस कोणतीही चूक झाल्याचे अथवा कमी आकारणी केल्याचे निदर्शनास आल्यास त्याप्रमाणे भाडेपट्ट्याची सुधारीत आकारणी करणेत येईल.

१८) पट्टेदार यांना शासनाबरोबर प्राथमिक स्वरुपाचा करारनामा करावा लागेल व त्यासाठी होणारी शासकिय फि भरणे व करारनामा नोंदणीकृत करुन घेणे पट्टेदारास बंधनकारक राहिल. भाडेपट्टा करारनामा नोंदणीकृत झाल्याशिवाय जमिनीचा ताबा दिला जाणार नाही.

१९) उक्त अधिनियमाचे उपबंध व त्यावेळी अंमलात असणारे सर्व नियम व आदेश त्यांचे उपबंध जेथवर लागू असतील तेथवर ते उक्त जमिनीच्या भोगवटयास लागू असतील

२०) वरील अटी व शर्ती व्यतिरिक्त शासन/जिल्हाधिकारी ठरवितील त्या अतिरिक्त अटी व शर्ती पट्टेदारास वरील बंधनकारक राहतील.



Scanned by CamScanner

२१) हया पट्टयाच्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्याच्या बाबतीत, पट्टेदार अधिनियमात व त्या अन्वये नियमात तरतुद केल्याप्रमाणे शास्तिस पात्र राहतील.

२२) वरील अटी शर्ती मान्य असल्याचे बंधपत्र रक्कम रु. २२०/- च्या मुद्रांकित पेपरवर टाईप करुन या कार्यालयास सात दिवसात सादर करावे.

स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी
यांची सही असे.

जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

प्रति,

महानगर गॅस लिमिटेड,
एमजीएल हाऊस, जी-३३,
बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,
बांद्रा(पू.), मुंबई - ४०० ०५१

प्रत :- १) मा. अपर मुख्य सचिव(महसूल), महसूल व वन विभाग यांचेकडे त्यांचेकडील ज्ञापन दि.३/१२/२००८ चे अनुषंगाने माहितीकरीता सविनय सादर.
२) मा. बिभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांचेकडे माहिती करीता सविनय सादर.
३) तहसिलदार, बोरीवली यांजकडे माहिती व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.
४) नगर भूमापन अधिकारी, गोरेगांव यांजकडे माहिती व पुढील कार्यवाहीकरिता रवाना.

स्थळप्रतीवर मा. जिल्हाधिकारी
यांची सही असे.

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हाकरीता

Received

Issued

L-650-sns